# प्रेस नोट

## परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील सहकारनगर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक ०४ /१०/ २०१८

उत्तमनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे निलेश ॲन्थोनी शिंदे वय-२८ वर्षे, रा. ननावरे चाळ, कोपरे रोड, उत्तमनगर, ता. हवेली जि. पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०४/२०१८ दिनांक ०४/१०/२०१८ रोजी (२) दोन वर्षा करीता पुणे शहर व पिंपरी चिंचवड तसेच पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम त्याच्या गुंड साथीदारांसह स्वतः जवळ घातक शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणे, मारामारी करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द वारजे माळवाडी,भारती विद्यापीठ,विश्रामबाग तसेच उत्तम नगर या पोलीस ठाणेस वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे तसेच पुणे जिल्ह्याचे कार्यक्षेत्रातून दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## प्रेस नोट

## परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील सहकारनगर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक ०५/१०/ २०१८

उत्तम नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे सागर दत्तात्रय धावडे, वय-२७ वर्षे, रा. आगळंबे फाट्या जवळ, कुडजे गांव, ता. हवेली, जि. पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०३/२०१८ दिनांक ०४/१०/२०१८ रोजी (१) एक वर्षा करीता पुणे शहर व पिंपरी चिंचवड तसेच पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम त्याच्या गुंड साथीदारांसह स्वतः जवळ घातक शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणे, खून करण्याचा प्रयत्न करणे, खंडणी मागणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द वारजे माळवाडी,सिंहगड रोड व उत्तम नगर या पोलीस ठाणेस वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री. मंगेश शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड तसेच पुणे जिल्ह्यातून एक (१) वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

# प्रेस नोट

## परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील सिंहगडरोड पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर व पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- ०३/१०/२०१८

सिंहगडरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे शाहरूख वासीम खान, वय-२३ वर्षे, रा. ४७/१२६ आरण्येश्वर, तावरे कॉलनी, पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५७ (अ) (१) (एक) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचे कडील तडीपार आदेश क्रमांक ०२/२०१८ दिनांक ०३/१०/२०१८ रोजी एक वर्षा करीता पुणे शहर पोलीस आयुक्तालाय व पुणे जिल्ह्याचे परिक्षेत्राचे हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसमा विरुध्द सिंहगडरोड,दत्तवाडी व कोंढवा पोलीस ठाणे येथे घरफोडी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्याला मा. अतिरिक्त मुख्य न्यायाधीश, पुणे यांनी घरफोडी चोरीच्या एकूण सात गुन्ह्यांमध्ये शिक्षा सुनावली आहे. त्याला सुधारणेची संधी देऊन सुध्दा त्याचेमध्ये कोणताही फरक न पडल्याने त्याला मंगेश शिंदे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्ह्याचे परिक्षेत्राचे हद्दीतून एक वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.